**सत्र प्रकरण क्रमांक १३४/२०२३**
**शासन वि. शेख अन्सार**
**निशाणी क्रमांक ३८/क**

सरकार तर्फे **साक्षीदार क्रमांक ०४** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव :— **उत्तरेश्वर नवनाथ भोसले**

वय :— ३८ वर्षे, व्यवसाय :— हॉटेल चालक
राहणार :— पिंपळनेर ता. जि.बीड

---

**सरतपासणी {ॲड.ए. एस. तांदळे सहा.सरकारी वकील}**

०१. दिनांक २३.१२.२०२० रोजी पोलीसांनी मला व आसाराम किसन नरवडे यांना पोलीस ठाणे येथे बोलवले. पोलीसांनी माझे समक्ष कोणताही मोबाईल जप्त केला नव्हता. पोलीसांनी फक्त सह्या घेतल्या.

**साक्षीदार अभियोग पक्षास मदत करीत नसल्याने सहा.सरकारी अभियोक्ता यांच्या विनंती वरून त्याची उलट तपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली.**

***उलटतपास अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री.ए.एस.तांदळे***

०२. हे म्हणणे खरे नाही की वरील तारखेस पोलीसांनी माझे समक्ष एक ओप्पो कंपनीचा दोन सिम कार्ड असलेला मोबाईल तसेच एक हायवा गाडी नं.एम.एच.२३ एव्ही ४५९७ भारत बेंझ कंपनीची तसेच महिंद्रा कंपनीची स्कॉर्पीओ एम.एच.२३ ए.एस.८८८६ माझे समक्ष जप्त केली. हे म्हणणे खरे नाही की त्याचा पोलीसांनी माझे समक्ष व आसाराम नरवडे यांचे समक्ष पंचनामा केला व त्यानंतर आम्ही त्यावर सह्या केल्या. मला आता दाखविण्यात आलेल्या सह्या माझेच आहे. साक्षीदार सांगतो की मला वाचता येत नाही. मला वाचता आले असते तर मी सही केली नसती. साक्षीदार सांगतो की महिन्यातुन एकदा तरी पोलीस अशा सह्या करण्यासाठी बोलवतात. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपींना वाचवण्यासाठी खोटी साक्ष दिली. आता पर्यंत मी ५० ते १०० केसेस मध्ये पिंपळनेर पोलीस ठाण्यात

सह्या केल्या आहेत. माझे पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या शेजारीच ५०० मिटरवर चहाचे हॉटेल आहे. साक्षीदाराने पंचनाम्यावरील सह्या मान्य केल्यामुळे तीन्ही दिनांक २५.१२.२०२० रोजीच्या जप्ती पंचनाम्यावरील **फक्त सह्यांना निशाणी क्र.३९, ४० व ४१** देण्यात येते. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपींना वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**उलटपासणी {ॲड.एस.बी.शेख सहा.सरकारी वकील}**

उलटतपास नाकारला.

**फेर तपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

RENUKA MANIKRAO SATAV
Digitally signed by RENUKA MANIKRAO SATAV
Date: 2026.02.18 17:59:26 +0530

**( रेणूका एम. सातव )**
अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बीड

दिनांक : १८/०२/२०२६